**पदोन्नतीच्या वेळी वेतन निश्चिती करता विकल्प.**

महाराष्ट्र शासन

**वित्त विभाग**

निर्णय क्रमांक पीएवाय. १०८२/सीआर-११००(एक) एसईआर-३

मंत्रालय, मुंबई, ४०० ०३२, दिनांक ६ नोव्हेंबर १९८४

**निर्णय**

नजिकच्या उच्च पदावर पदोन्नती झाल्यावर राज्य शासकीय कर्मचाऱ्याची वेतननिश्चिती कशी करावी याची तरतूद महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ यांमधील नियम क्रमांक ११ मध्ये नमूद केली आहे. शासनाकडे असे निवेदन करण्यात आले आहे की, या तरतुदीनुसार कनिष्ठ व्यक्तीला त्याच्या कनिष्ठ पदाच्या वेतनातील वेतनवाढ मिळाल्यानंतर उच्च पदावर पदोन्नती मिळाल्यास, त्या व्यक्तीला वरिष्ठ असलेल्या व्यक्तीच्या वेतनामध्ये—जरी अशी वरिष्ठ व्यक्ती त्या अगोदर पदोन्नत झाली असेल व तिने आपल्या कनिष्ठ व्यक्तीपेक्षा कधीही कमी वेतन घेतलेले नसेल— तरी विसंगती निर्माण होते. शासनाने या विषयाचा विचार करून, शासन आता असे आदेश देत आहे की, शासकीय कर्मचाऱ्याची पदोन्नती झाल्यावर वेतननिश्चितीच्या बाबतीत त्याला खालीलप्रमाणे विकल्प देण्यात यावा :—

(अ) एकतर कनिष्ठ पदावरील वेतनमानात पुढे येणाऱ्या वेतनवाढीनंतर, पुर्नविचार न होता सुरुवातीची वेतननिश्चिती (पदोन्नतीच्या) वरिष्ठ पदावर सरळ महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम क्रमांक ११ (एक) (ए) खाली करावी;

**किंवा**

(ब) पदोन्नतीनंतर सुरुवातीस त्याचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम क्रमांक ११ (एक) (बी) मध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रथम निश्चित करावे, आणि खालच्या पदावरील वेतनमानात पुढील वेतनवाढ मिळाल्यावर उक्त नियमाच्या नियम क्रमांक ११ (एक) (ए) खाली त्या वेतनाची पुर्ननिश्चिती करण्यात यावी.

२. जर वरील (ब) नुसार वेतननिश्चिती करण्यात आली असेल तर, अशा व्यक्तीची पुढील वेतनवाढ वेतन पुर्ननिश्चिती केल्याच्या तारखेपासून १२ महिन्यांच्या वेतनवाढ कालावधीनंतर देय असेल.

३. यामध्ये असे होण्याची शक्यता आहे की, अशा रीतीने उच्च पदावर पदोन्नत झालेला शासकीय सेवक अशाच उच्च पदावर पदोन्नत झालेल्या आणि त्याला कनिष्ठ असलेल्या व्यक्तीपेक्षा कमी वेतन घेईल. अशा प्रकारची विसंगती दूर करण्याकरिता शासन असे आदेश देत आहे की, अशा ठिकाणी त्या उच्च पदावर, कनिष्ठ असलेल्या व्यक्तीचे जे वेतन निश्चित केले असेल त्या आकड्यापर्यंत वरिष्ठ व्यक्तीचे वेतन वाढविण्यात यावे. अशा प्रकारे करण्याची वेतनातील वाढ कनिष्ठ व्यक्तीच्या पदोन्नतीच्या तारखेपासून होईल आणि ती खालील अटींच्या अधीन असेल :—

(१) वरिष्ठ व कनिष्ठ दोन्ही व्यक्ती एकाच संवर्गातील असाव्यात आणि ज्या पदावर त्यांची नियमित पदोन्नती झाली आहे ते पद समरूप आणि एकाच संवर्गातील व एकाच बढती क्रमांकातील असावे;

(२) अशा व्यक्ती ज्या कनिष्ठ आणि वरिष्ठ पदावर वेतन घेत असतील त्या वेतनश्रेण्या समरूप असाव्यात; आणि

(३) निर्माण झालेली विसंगती या आदेशाचा प्रत्यक्ष परिणाम म्हणून झालेली असावी. उदा.—वेतननिश्चितीच्या सर्वसाधारण नियमानुसार अथवा त्याला मंजूर करण्यात आलेल्या आगाऊ वेतनवाढीमुळे अथवा या आदेशाव्यतिरिक्त इतर तरतुदीनुसार कनिष्ठ कर्मचाऱ्याचे वेतन पदोन्नतीनंतर निश्चित करण्यात आल्यामुळे, वरिष्ठ व्यक्तीपेक्षा कनिष्ठ व्यक्ती खालच्या पदावर जास्त वेतन घेत असेल, तर या शासन निर्णयातील तरतुदींचा वरिष्ठ व्यक्तीचे वेतन वाढविण्यासाठी वापर केला जाऊ नये.

४. या आदेशातील तरतुदीनुसार वरिष्ठ व्यक्तीचे वेतन पुर्ननिश्चित करण्याबाबतचे आदेश महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम क्रमांक ४० अन्वये काढण्यात यावे. अशा वरिष्ठ व्यक्तीची पुढील वेतनवाढ त्याच्या वेतन पुर्ननिश्चितीच्या तारखेपासून आवश्यक ती अर्हताप्राप्त सेवा पूर्ण झाल्यानंतरची असावी. हे आदेश काढण्याचे अधिकार अराजपत्रित कर्मचाऱ्यांच्या बाबतीत विभागीय प्रमुखांना व राजपत्रित अधिकाऱ्यांच्या बाबतीत मंत्रालयीन विभागांना याद्वारे देण्यात येत आहेत.

५. हे आदेश दिनांक १ मे १९८१ पासून अंमलात येतील. दिनांक १ मे १९८१ किंवा नंतर आणि हे आदेश निर्गमित होण्याच्या दिनांकापर्यंत पदोन्नत झालेल्या व्यक्तींना, जरूर तो विकल्प देण्यासाठी हे आदेश काढल्याच्या तारखेपासून ३ महिन्यांचा कालावधी देण्यात यावा. तसेच ज्या व्यक्ती यानंतर पदोन्नत होतील, अशा व्यक्तींनासुद्धा त्यांच्या पदोन्नतीच्या तारखेपासून या आदेशानुसार वेतननिश्चितीचा विकल्प देण्यासाठी एक महिन्याचा कालावधी देण्यात यावा. दोन्ही प्रकरणांमध्ये एकदा दिलेला विकल्प अखेरचा समजण्यात येईल.

६. या आदेशानुसार वेतन पुर्ननिश्चित केल्यामुळे द्यावी लागणारी थकबाकी दिनांक १ ऑक्टोबर १९८४ पासून रोख रकमेत देण्यात यावी. तसेच दिनांक १ मे १९८१ ते दिनांक ३० सप्टेंबर १९८४ या कालावधीतील थकबाकी संबंधित व्यक्तींच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यात यावी. तथापि ज्या व्यक्ती दिनांक १ मे १९८१ ते दिनांक ३० सप्टेंबर १९८४ या कालावधीत यापूर्वीच सेवानिवृत्त झालेल्या आहेत त्यांना त्यांची थकबाकी रोख रकमेत देण्यात यावी.

७. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या संबंधित नियमांमध्ये यथावकाश आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील.

८. ह्या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

22/78

**नरेंद्र कर्णिक,**
शासनाचे अवर सचिव.

(G.C.P.) H 1985 (9505—11-84)

*Option for pay fixation at the time of promotion.*

GOVERNMENT OF MAHARASHTRA

FINANCE DEPARTMENT

Resolution No. PAY-1082/CR-1100 (i)/SER-3

Mantralaya, Bombay 400 032, dated 6th November 1984

*RESOLUTION*

The existing provisions regarding fixation of pay of a State Government employee on his promotion to the next higher post are contained in Rule 11 of the Maharashtra Civil Services (Pay) Rules, 1981. It has been represented to Government that under these provisions promotion of a junior person to the higher post after accrual of his increment in the lower post, gives rise to an anomaly in pay of a person senior to him, who though promoted earlier and had not drawn, at any time, pay less than that of his junior in the lower post. Government has considered this matter and is pleased to direct that an employee may be given an option for fixation of his pay on promotion as under :—

(*a*) Either his initial pay may be fixed in the higher post on the basis of Rule 11 (1) (*a*) of the Maharashtra Civil Services (Pay) Rules, 1981 straightway without any further review on accrual of increment in the pay-scale of the lower post;

*OR*

(*b*) His pay on promotion may be fixed initially in the manner as provided under Rule 11 (1) (*b*) of the Maharashtra Civil Services (Pay) Rules, 1981, which may be refixed on the basis of the provisions of Rule 11 (1) (*a*) of the said Rules on the date of accrual of next increment in the scale of pay of the lower post.

2. If the pay is fixed under (*b*) above, the date of next increment will fall due on completion of 12 months of the incremental period from the date the pay is refixed on the second occasion.

3. It may happen that a Government servant so promoted to a higher post draws less pay than his junior promoted to such higher post. In order to remove such anomaly, Government is pleased to direct that the pay of the senior person in the higher post should be stepped-up to a figure equal to the pay as fixed for the junior person in that higher post. Stepping-up may be done with effect from the date of promotion of the junior person and will be subject to the following conditions :—

(*i*) Both the senior and junior person should belong to the same cadre and the post in which they have been promoted on regular basis, should be identical and in the same cadre and in the same line of promotion;

(*ii*) Scales of pay of the lower and higher post in which they are entitled to draw pay should be identical; and

(*iii*) The anomaly should be directly as a result of these orders. For example, if even in the lower post the junior person was in receipt of higher pay than the senior person by virtue of fixation of pay under the normal rules; or due to any advance increments granted to him; or fixation of pay of the junior person on promotion was regulated under different provisions other than these orders, then the provisions contained in this Government Resolution should not be evoked to step-up the pay of the senior person.

4. The orders refixing the pay of the senior officer in accordance with the provisions of these orders should be issued under Rule 40 of the Maharashtra Civil Services (Pay) Rules, 1981 and the next increment of such senior person should be drawn on completion of the required qualifying service with effect from the date of refixation of pay. The powers to refix the pay of a Government servant under these orders are hereby delegated to the Heads of Departments in respect of Non-gazetted Government servants and to the Administrative Departments of the Mantralaya in respect of Gazetted Government Officers.

5. These orders shall take effect from 1st May 1981. Persons promoted on or after 1st May 1981 and the date of issue of these orders should be given three months' time from the date of issue of this Government Resolution, for exercising the necessary option. Persons who will be promoted hereafter should also be given option for getting their pay fixed in terms of these orders, within one month from the date of promotion. In both the cases, the option once exercised shall be final.

6. Arrears payable on account of re-fixation of pay should be paid in cash from 1st October 1984. Arrears for the period from 1st May 1981 to 30th September 1984 should be credited to the Provident Fund Account of individual. However, in respect of persons who have already retired during the period from 1st May 1981 to ...h September 1984 the arrears should be paid in cash.

7. Necessary amendments to the relevant Rules of the Maharashtra Civil Services (Pay) Rules, 1981 will be issued in due course.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

78

N. [illegible] KARNIK,
Under Secretary to Government.